भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/११/२०१७

**१) शेतातील धानाचे पुंजने आग लावुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २०/११/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी यशवंत महादेव तितीरमारे वय ६० वर्ष रा. तामसवाडी याने ठेक्याने केलेल्या शेतामध्ये ठेवलेल्या धानाचे पुंजने कि. ७२,०००/रु चे यातील संशयीत आरोपीने आग लावुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४३५ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२)भांडण व शिवीगाळ करून कुऱ्हाडीने डोक्यावर मारून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/११/२०१७ चे २०.३० वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून जखमी फिर्यादीचे अंगणात प्रवेश करून फिर्यादीचे पती रमेश मलेवार याला माल दे? असे म्हणुन भांडण, शिवीगाळ करून आरोपी क्र. १ ने जिवे मारण्याच्या उद्देशाने कुऱ्हाडीने फिर्यादीचे डोक्यावर मारून गंभिर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने जखमी फिर्यादी सौ. लक्ष्मी रमेश मलेवार वय ५० वर्ष, रा. शिवाजी नगर तुमसर यांचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७,४४७,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी.म्हसकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३)संगनमत करून मारहाण करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/११/२०१७ चे १८.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी प्रवीण रमेश बोरकर हा घरी असतांनी आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून फिर्यादीचे घरी जावुन आरोपी क्र.१ व २ ने फिर्यादीचे कॉल्लर पकडुन त्यास उप सरपंच पदासाठी मिटींगमध्ये का बोलला? असे म्हणुन हाता बुक्यानी त्याचे डोक्यावर, पोटावर व कानावर मारत असतांनी फिर्यादीची पत्नी सोडवीण्यास गेली असता तिला सुध्दा ढकलढुकल करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,३२३,५०६,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) पायावर ट्रक जावुन रोडचे खाली पडुन डोक्याला मार लागल्याने स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद**

दिनांक २०/११/२०१७ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी मृतक मुक्तदा निजाम वय ३० वर्ष रा. फतेपुर कमाडी विद्यालय बिहार याने त्याचे ताब्यातील बंद ट्रकला दुसऱ्या वाहनाच्या साहयाने निष्काळजीपणे चाबी लावुन बंद ट्रकला धक्का देत असतांनी, त्याचे ताब्यातील ट्रकचे खाली दोन्ही पायावर ट्रक जावुन तो रोडचे खाली पडुन, डोक्याला मार लागल्याने जागीच स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा सोडगिर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी ताराम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जखमी :–

दिनांक २०/११/२०१७ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सौ. सत्यभामा पुरूषोत्तम अंडेल वय ३७ वर्ष रा. मुरमाडी हीची बहिन लेक अमोल कचरू खोब्रागडे वय २३ वर्ष रा. मंढकी याचे सह मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ८१७१ ने येत असतांना लाखांदुर कोर्टा जवळ लाखांदुर कडुन साकोली कडे जाणाऱ्या अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मागचे बाजुला धडक मारल्याने फिर्यादी व तिचा बहिन लेक खाली पडल्याने फिर्यादीचे डोक्यास मार लागुन जखमी झाली व डावे हाताचे कोनीजवळ मुका मार लागल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी बयाण व डॉ रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३८ भा.दं.वी. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

६) क्षुल्लक कारणा वरून शिवीगाळ करून डोक्यावर कुऱ्हाड मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/११/२०१७ चे १५.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी रंजित प्रेमचंद चंडाले वय ३९ वर्ष रा. जामपहाडी टोली हा व त्याची पत्नी ही घरी हजर असतांना, आरोपी क्र.१ तिचे घरून फिर्यादी व फिर्यादीचे पत्नीस तुम्ही रोज मटण का खाता? असे बोलुन शिवीगाळ करीत असता फिर्यादीचे पत्नीने आरोपी क्र. १ हीला हटकले असता, आरोपी क्र.२ ने माझ्या आईला का बोलली? असे बोलुन फिर्यादीचे पत्नीचा हात पकडला असता, फिर्यादीने माझ्या पत्नीचा हात का पकडला? असे बोलला असता, आरोपी क्र.२ ने शिवीगाळ करून आरोपी क्र. ३ ने फिर्यादीचे मागेहुन हात पकडला व आरोपी क्र. २ ने मागेहुन फिर्यादीचे डोक्यावर कुऱ्हाड मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,२९४,५०६,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी इंगडे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो हा करडी येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सफौ. बावणे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/११/२०१७ चे १८.१५ ते १८.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महीन्द्रा मॅक्स गाडी ही बसस्थानक तुमसर येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सपोनी. म्हसकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

९) दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/११/२०१७ चे २०.४५ ते २०.३५ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारू पिऊन दारूचे नशेत चालविंतानी मिळुन आल्याने त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी पोउपनी गेडाम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १८५(३), १८१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**१०) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी .  :—**

दिनांक २०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, वरठी, तुमसर, गोबरवाही व भंडारा येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २२ लिटर ५०० मिली लीटर हातभट्टी दारू किंमती २१२०/—रूपया तसेच जुगारातुन किंमती २,८१८/—रु असा एकुण किंमती ४,९३८/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०५ तीन सिटर वाहनांवरती २२ केसेस व ईतर वाहनांवरती १०५ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.